अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# रेल्वेच्या सुरक्षा व्यवस्थेचाच पंचनामा करा

रेल्वेच्या अपघाताविषयी वारंवार लिहिण्याची वेळ यावी हे दुर्दैव म्हणावे लागेल. गेल्या वर्षात देशभरामध्ये तब्बल १५ हजार रेल्वे प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले. यावरून आपल्या देशात मनुष्याचे जीवन किती स्वस्त झाले आहे हे दिसून येते. दिवा सावंतवाडी रेल्वेला झालेला अपघात हा असाच रेल्वेच्या हलगर्जीपणाचा नमुना ठरतो. सुरक्षा व्यवस्थेकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्यामुळेच हा अपघात घडला यामध्ये काहीही शंका उरत नाही. मग तो अपघात रेल्वे रुळाला तडा गेल्यामुळे झाला की रेल्वेचे ब्रेक फेल झाल्यामुळे घडला हा मुद्दाच गौण ठरतो. या सगळया गोष्टींची खातरजमा करून घेण्यासाठी रेल्वेची सुरक्षा व्यवस्था कार्यक्षम असणे गरजेचे ठरते. तसे पाहिले तर गेल्या १५ दिवसांपासून मुंबई किंवा महाराष्ट्रामध्ये रेल्वे अपघाताचे बरेच प्रकार घडले. लागोपाठ तीन गाड्यांमध्ये आगी लागण्याचा प्रकार घडला. थोडक्यात सांगायचे तर एकापाठोपाठ एक अपघातांची साखळीच गुंफलेली पाहायला मिळते. आज रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची संख्या कोट्यवधीच्या घरात आहे. भारतीय रेल्वे ही प्रवासी वाहतुकीसाठीच जास्त महत्त्वाची ठरते. या परिस्थितीमध्ये सुरक्षा व्यवस्था किती काटेकोर असणे गरजेचे आहे हेदेखील आपोआप स्पष्ट होते. अलीकडेच रेल्वेच्या कारभाराविषयी डॉ. अनील काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने आपला अहवाल सादर करून आता जवळपास वर्ष होईल परंतु त्यातल्या एकाही शिफारशीची अंमलबजावणी झालेली नाही. यावरूनच सरकारला रेल्वेची म्हणजेच प्रवाशांच्या सुरक्षिततेची काळजी नाही असा स्पष्ट अर्थ निघतो. ज्या पध्दतीने आणि ज्या वेगाने रेल्वे अपघात घडत आहेत त्यात अतिशय किरकोळ कारणामुळे होणाऱ्या या अपघातामध्ये हजारो प्रवाशांचे नाहक बळी जात आहेत. दिवा–सावंतवाडी रेल्वे अपघाताच्या चौकशीचे आदेश जरी दिले गेले असले तरी त्याचे कारण शोधून संबंधितांवर तातडीने कारवाई होईलच याची खात्री देता येत नाही. कारण अशा चौकशा होत राहतात त्याचे अहवाल सादर होतात, परंतु कारवाई मात्र काहीही होत नाही. म्हणजे सुरक्षा व्यवस्थेची अंमलबजावणी करायची नाही आणि गैरव्यवस्था करणाऱ्यांना शिक्षाही करायची नाही. अशा बेजबाबदारपणामुळे रेल्वेचा कारभार सध्या रामभरोसे सुरू आहे

### कोकण रेल्वेकडे दुर्लक्ष

प्रामुख्याने मुंबईसारख्या महानगरातून कोकणात जाण्यासाठी कोकण रेल्वेचा सर्वाधिक वापर होतो. सध्या एकेरी मार्ग असलेल्या कोकण रेल्वेवर गाड्यांची संख्यादेखील वाढलेली आहे. एक तर डोंगरदऱ्यातून आणि खडतर मार्गाने कोकण रेल्वे तयार केली गेली. अन्य रेल्वेमार्गापेक्षा तिचे स्वरूपही वेगळे आहे. मोठ्या प्रमाणावर असलेले बोगदे मोठ मोठे पूल या सगळयाचा विचार केला तर कोकण रेल्वे मार्गाची सुरक्षितता किंवा खबरदारी अधिक गंभीरतेने घेण्याची गरज निर्माण होते. कारण या भागातला भूप्रदेशही वेगळया स्वरूपाचा आहे आणि म्हणूनच पावसाळ्यात दरडी कोसळण्याच्या सर्वाधिक घटना कोकण रेल्वे मार्गावर घडतात. पावसाळ्यात तर दोन दोन दिवस रेल्वेमार्ग ठप्प होतो. कोणत्याही वेळी रुळाखालची जमीन घसरण्याची शक्यता असते. अशा एक ना अनेक कारणांमुळे कोकण रेल्वेची सुरक्षितता महत्त्वाची ठरते. या अतिशय महत्त्वाच्या गोष्टींकडेच रेल्वेने दुर्लक्ष केल्याने अपघातांची संख्या वाढत चालली आहे. प्रश्न असा निर्माण होतो की, रेल्वेच्या या गलथान कारभाराचे प्रवाशांनी बळी का व्हावे; या मार्गाची सुरक्षा काटेकोरपणे ठेवणे रेल्वेला जर शक्य होत नसेल तर तसे रेल्वेने जाहीरपणे सांगून टाकावे म्हणजे प्रवाशांनादेखील प्रवास करताना किती जोखीम घ्यायची याचा निर्णय घेता येईल. आमची तर अशी मागणी आहे की, या अपघाताची चौकशी केली जात असताना सुरक्षा व्यवस्थेतील तुटीचीदेखील कठोरपणे चौकशी केली जावी आणि कोणकोणत्या कारणांमुळे या मार्गावरची सुरक्षा व्यवस्था धाब्यावर बसवली गेली आहे याचा एकदा पंचनामा केला जावा.आतापर्यंत रेल्वे अपघाताबाबत सुरक्षा व्यवस्थेतील हेळसांड हेच त्यामागचे कारण असल्याचे आढळून आलेले आहेत. कारण ज्या तांत्रिक चुकांमुळे अपघात झाल्याचे रेल्वेतर्फे सांगितले जाते त्या चुका टाळता येणे शक्य होऊ शकते. परंतु रेल्वेकडे तशी मजबूत यंत्रणाच नाही, त्याचा फटका सामान्य प्रवाशांना सोसावा लागतो आहे.

### पुरेशी वैद्यकीय मदत नाही

याच सुरक्षा व्यवस्थेचे धिंडवडे काढणारा आणि प्रवाशांच्या जीवाला मातीमोल ठरविणारा प्रकार या अपघाताच्या वेळी दिसून आला. कारण अपघात झाल्यानंतर काही मिनिटांमध्ये ज्या मदतयंत्रणा तिथे पोहोचायला हव्या होत्या त्या पोहोचल्या नाहीत. वैद्यकीय मदत करणारे पथकदेखील रेल्वेकडे तयार नव्हते आणि अशा या दिरंगाईमुळे अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय मदत मिळू शकली नाही आणि त्यामुळे देखील अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. दिवसागणिक या अपघातातील बळींची वाढत जाणारी संख्या रेल्वे आणि इतर मदतयंत्रणा कुचकामी ठरल्याचे दाखविते. ज्या दिवशी अपघात घडला त्या दिवशी १५० जखमींना नागोठणे इथल्या रुग्णालयात नेले गेले. परंतु तिथे केवळ तीन डॉक्टर उपलब्ध होते यावरून हलगर्जीपणांचा कहर झाल्याचे दिसून येते. कारण तीन डॉक्टर १५० जखमींवर कसे काय लक्ष ठेवतील. त्यातील अनेकांना तर नंतर रोहा आणि सायनच्या हॉस्पिटलमध्ये आणावे लागले. पुरेशा रुग्णवाहिका नाहीत, प्रशिक्षित वैद्यकीय पथक नाही, अशा सगळ्या विपरित परिस्थितीशी जखमींना तोंड द्यावे लागले. या दुर्दैवी अपघातात सामान्य माणसे बळी पडली आहेत. त्याला रेल्वेचा आणि शासकीय यंत्रणेचा गैरकारभारच जबाबदार ठरतो. यासाठीच अपघाताची चौकशी करीत असताना मदत कार्यातल्या गोंधळाची आणि तुटींची गंभीरतेने दखल घेतली गेली पाहिजे. अपघात घडल्यावरसुध्दा जर मदत करणाऱ्या यंत्रणा जाग्या होत नसतील किंवा सुस्त पडून राहत असतील तर त्याचीसुध्दा जबाबदारी निश्चित केली पाहिजे. अशा आणीबाणीच्या किंवा संकटाच्या प्रसंगी या यंत्रणा दक्ष राहत नसतील तर त्यातल्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना जाब विचारला गेला पाहिजे.